वर्ष-०७ | अंक-४६ | मुंबई, मंगळवार ०५ ते ११ ऑक्टोबर २०२१ | पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र
●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
जळगावात दंगल, पोलिसांवर दगडफेक; 'उसने हमारी बहन को छेडा है' म्हणत...

3 बाईक जाळल्या, हातात तलवारी नाचवणारे सीसीटीव्ही समोर, कल्याणमध्ये गुन्हेगारी शिगेला
अनधिकृतरित्या अंमली पदार्थांची विक्री करतांना नायगांव येथून 03 नायजेरीयन नागरिकांस अटक 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## पश्चिम उपनगरांत बुधवारी काही ठिकाणी पाणी बंद



मुंबई : मुंबई महानगरपालिकेतर्फे के/पूर्व विभागात, जोगेश्वरी (पूर्व) येथे महाकाली गुंफा मार्गावर नंदभवन इंडस्ट्रीजजवळ वर्सोवा आऊटलेट या जलवाहिनीवर दुरुस्तीचे काम बुधवारी, ६ ऑक्टोबरला सकाळी १०पासून ७ ऑक्टोबरला सकाळी १० पर्यंत के ले जाणार आहे. या कालावधीत के/पूर्व आणि के/पश्चिम विभागांमधील काही परिसरात पाणीपुरवठा होणार नाही. तर काही भागांमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा होईल.

व्ही. पी. मार्ग, जुहू गल्ली, उपासना गल्ली, स्टेशन मार्ग या ठिकाणी पहाटे ३.३० ते सकाळी ८.३० पर्यंत आणि गिल्बर्ट हील येथे सकाळी ८.३० ते ११.१५ ...पान २ वर...

## शाळा परत बंद करायच्या नाहीत, त्यासाठी...
# मुख्यमंत्र्यांनी केलं खास आवाहन





मुंबई, कोरोनामुळे गेल्या दीड वर्षांपासून बंद असलेल्या शाळांची दार आज पुन्हा एकदा उघडली आहे. आजपासून सुरु झालेल्या शाळा परत बंद करायच्या नाहीत अशा निर्धाराने शिक्षण सुरू ठेवू', असं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितलं. मुख्यमंत्र्यांनी आज राज्यातील सर्व विद्यार्थी, शिक्षक यांच्याशी संवाद साधला आणि शुभेच्छा दिल्या. तसंच, 'शाळा सुरू करुन आपण मुलांच्या विकासाचे, प्रगतीचे दार मुलांसाठी उघडतो आहोत. मात्र मुलांची अधिक काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे', असं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केलं. कोरोनासाठीचे निर्बंध शिथील करून राज्यातील शाळांची प्रत्यक्ष सुरुवात आजपासून करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'माझे विद्यार्थी, माझी जबाबदारी' या बोधचिन्हाचे अनावरणही करण्यात आले. 'आज जेव्हा सर्व विद्यार्थी पुन्हा एकदा शाळेत जाणार आहेत. तेव्हा मला माझे शाळेचे दिवस आठवत आहेत. सुट्टीनंतर शाळेचा पहिला दिवस उत्साहाने भरलेला असायचा. मित्रांना भेटण्याची उत्सुकता असायची, नवीन वह्या पुस्तके, गणवेश मिळायचे. आत्ताच्या विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला हा सर्वात आव्हानात्मक काळ सुरू आहे. मुलं ही फुलासारखी नाजूक असतात, त्यांचे वय घडण्याचे असते या विषयावर टास्क फोर्सशी नियमीत चर्चा होत असते. ...पान २ वर...

## मिरा भाईंदर मध्ये महिलांसाठी 'भरोसा सेल' कक्ष स्थापन




मिरा-भाईंदर : दि.०१.१०.२०२१ रोजी पोलीस आयुक्त, भाईंदर कार्यालय, येथे मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते 'भरोसा सेल' कक्षाचे उद्धाटन करण्यात आले. मिरा-भाईंदर शहराची ...पान २ वर...

## ठाकरे सरकार झाले अनाथांचे आधार




मुंबई, कोरोनाची महामारी आज आटोक्यात आली आहे. पण, तिच्या जखमा अजूनही कायम आहे. कोरोनाची लागण झाल्यामुळे अनेक कुटुंब उद्ध्वस्त झाली आहे. घरातील कर्त्या पुरुषाचे निधन झाल्यामुळे अनेक मुलांवरील आई-वडिलांचे छत्र हरपले आहे. अशा या निराधार मुलांचे ठाकरे सरकार आधार झाले आहे. राज्यातील 306 मुलांच्या खात्यात प्रत्येकी पाच लाख रुपये जमा करण्यात आले आहे. कोरोना संकटाने राज्यातील अनेक बालकांचे छत्र हिरावून नेले. दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना मदत म्हणून प्रत्येकी 5 लाख रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याप्रमाणे अशा बालकांच्या ...पान २ वर...

## गुन्हे शाखा कक्ष -3 विरार यांच्या सतर्कतेमुळे आंतरराज्यीय टोळीच्या चार सदस्यांचा पदार्पाश




मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिन्या पासुन सकाळी घरातून मोबाईल फोन, लॅपटॉप, मौल्यवान वस्तु चोरी करणारी टोळी सक्रीय झाली होती. सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपी यांचा शोध घेवुन सदर प्रकारच्या गुन्हयांना पायबंद घालण्यासाठी त्याअनुषंगाने वरीष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ च्या पोलीस पथकाने गुप्त बातमीदार यांच्या कडून मिळालेल्या खात्रीशीर माहीतीच्या आधारावर आरोपी १) सत्यनाथन व्यंकटेश बोयार वय- ३३ वर्षे, रा.राज्य- तामिळनाडु २) मंजुनाथन गणेश गोविंदस्वामी, वय- २५ वर्षे, रा. राज्य- तामिळनाडु ३) सुरेश कुप्पन बोयार वय- २६ वर्षे, रा., राज्य- ...पान २ वर...

## पोलीस आयुक्तालय वर्धापनदिनी तुळींज पोलिसांनी मुद्देमाल परत करण्याची केली यशस्वी कामगिरी




तुळींज पोलीस ठाण्यामध्ये हरवलेल्या वा चोरीस गेलेल्या वस्तूं बद्दल करण्यात आलेल्या तक्रारीची दखल घेऊन त्यांचा तपास करून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल मिरारोड भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वर्धापन दिनानिमीत्त तक्रारदार यांना दिनांक ०१/१०/२०२१ रोजी परत करण्यात आला. सदर कार्यक्रमादरम्यान सोन्याचे दागिने, २ कार, ३ रिक्षा, ४ मोटारसायकल ...पान २ वर...

## मोटारसायकल चोरणाऱ्या टोळीस केली अटक - गुन्हे शाखा कक्ष १ काशिमिरा यांची कामगिरी



मिरारोड : दहिसर पश्चिम येथे राहणारे मयुर अरूण गायकवाड वय ३५ यांनी गोकुळ केमीस्ट मेडीकल शॉपसमोर, साईबाबा नगर, मिरारोड पुर्व याठिकाणी त्यांची मोटारसायकल उभी केली होती ती दिनांक १८/०९/२०२१ रोजी रात्री १०:०० वा. ते दिनांक १९/०९/२०२१ रोजी सकाळी ९:३० वा. त्याठिकाणावरून कोणी तरी ...पान ४ वर...

## महानगरपालिकेतील भ्रष्ट अधिकाऱ्यांना हटवण्यासाठी फाईट फोर राईट चे राजू विश्वकर्मा यांचे उपोषण

## आंदोलनास सुरुवात




पालिकेत बसलेले भ्रष्ट अधिकारी ज्यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत असे असूनही, त्यांना कोणत्या कायद्याअंतर्गत पदावर बसविण्यात आले आहे. अशा सर्व अधिकाऱ्यांना तात्काळ अयोग्य घोषित करावे, या मागणीसह भाईंदर पूर्वेच्या कस्तुरी पार्कमधील फाईट फॉर राईट एनजीओचे श्री राजू विश्वकर्मा यांनी आज दिनांक ०४/१०/२०२१ पासून उपोषण सुरू केले आहे.तरी या चळवळीत आपण सर्व त्यांच्या बरोबर आहोत . हे अंदोलन जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत चालू राहणार आहे.

## गुन्हे शाखा कक्ष-१ काशिमिरा यांनी कारटेप चोरणाऱ्या गुन्हेगारांना केली अटक




भाईंदर : दिनांक १३/०७/२०२१ रोजी ०२:५१ वाजता विजयकुमार लक्ष्मीनारायण गुप्ता, रा.भाईंदर पुर्व व कमलेश भानाभाई पटेल यांच्या कार च्या काचा फोडून व नुकसान करून त्यामधील २८,०००/- रुपये किंमतीचे दोन कार टेप कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी झाल्याची तक्रार नवघर पोलीस ठाणे येथे नोंदविली त्यानुसार आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्यांचा तपासाच्या अनुषंगाने गुन्हे प्रकटिकरण कक्ष-१, यांनी घटनास्थळावरून तांत्रिक पुरावे व मिळालेल्या गोपनीय बातमीच्या आधारे सदरचे गुन्हे करणारा इसम हा रुपेश वालेतीन डिमेलो रा. वसई असल्याची माहिती पोलिसांना मिळाली . त्याअनुषंगाने त्याच्या बाबत सविस्तर माहिती काढून त्यास दिनांक ०२/०९/२०२१ रोजी वसई येथून ताब्यात घेण्यात आले व त्याच्याकडून चोरलेल्या अल्टो कार, पेनड्राईव्ह, ...पान २ वर...

## वाहन चोरणाऱ्या अट्टल गुन्हेगारांस अटक करण्यात वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेस यश




दिनांक : १/१०/२०२१ : वालीव पोलीस ठाणे ०५, मुंब्रा पोलीस ठाणे ०१, कळवा पोलीस ठाणे ०१, असे एकूण ०७ वाहन चोरीचे गुन्हे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले होते . त्यानुसार या गुन्ह्यांचा शोध घेवून वाहन चोरांस लवकरात लवकर पकडून सदर गुन्हे उघडकीस आणण्याचे काम पोलीस पथकासमोर होते वालीव पोलीस ठाणे ...पान २ वर...

# पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते यांच्या उपस्थितीत संपन्न झाले आचोळे पोलीस ठाण्याचे उद्घाटन

दिनांक ०२/१०/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते यांचे उपस्थितीत महिला पोलीस अमंलदार श्रीमती ठाकरे यांचे हस्ते आचोळे पोलीस ठाण्याचे उद्धाटन करण्यात आले आहे. तुळींज पोलीस ठाणे हद्दितील वाढती लोकसंख्या व



त्यामुळे वाढलेल्या गुन्हेगारीचे प्रमाण नियत्रंणात आणण्याच्या दृष्टीने नवीन पोलीस ठाण्याची निर्मीती करणे आवश्यक झाले होते. सदर बाबींची आवश्यकता लक्षात घेवून मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय या आठवडयामध्ये...पान २ वर...

## जळगावात दंगल, पोलिसांवर दगडफेक; 'उसने हमारी बहन को छेडा हैं' म्हणत...



जळगाव:जळगाव येथे खंडेरावनगरातील आझादनगर भोईवाडा परिसरात प्रेमीयुगूल फिरत असताना त्यातील तरुणीची छेड काढल्याच्या कारणावरून दोन गटात वाद झाला. यावेळी घटनास्थळी दाखल झालेल्या तीन पोलीस कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करून त्यांच्यावर दगडफेक करत जखमी करण्यात आले. याचवेळी दोघा गटांनीही एकमेकांवर दगडफेक केली. यात एक पोलीस कर्मचारी जखमी झाला. ही घटना शनिवारी रात्री साडेदहा वाजता घडली. रात्री उशिरा २९ जणांवर याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून त्यातील सहा जणांना अटक करण्यात आली आहे. खंडेरावनगर परिसरात असलेल्या अझादनगर भागात एक प्रेमीयुगूल फिरत होते. यातील तरुणीची छेड काढल्याचे कारण पुढे करीत दो गट समोरा-समोर आल्याने प्रचंड तणाव निर्माण झाला. याबाबत माहिती मिळताच रामानंदगनर पोलीस ठाण्याचे संजय भीमदास सपकाळे, सुशील चौधरी व प्रवीण जगदाळे हे तीन कर्मचारी घटनास्थळी गेले. यावेळी ५० ते ६० जणांचा जमाव एकमेकांवर दगडफेक करत होता. पोलिसांनी काही वेळातच जमावात जाऊन समजावण्याचा प्रयत्न केला. यावेळी दानिश बालिक पिंजारी याने 'उसने हमारी बहन को छेडा है, तुम क्यो आये' असे म्हणत त्याने पोलिसांना शिवीगाळ केली. तर अशपाक खान, रमजान पिंजारी, रेहान शेख व समीर शेख सलीम यांनी पोलिसांना धक्काबुक्की केली. यानंतर काही सेकंदातच या परिसरात तणाव आणखी वाढला. चहुबाजूने दगडफेक सुरू झाली. अंधार असलेल्या गल्ली-बोळातून दगडफेक केली जात होती. यात गजू उत्तम चौधरी व सिराज सुपडू पिंजारी यांच्या घराच्या काचा फुटल्या. तसेच पोलीस कर्मचारी संजय सपकाळे हे जखमी झाले. त्यांनी पोलीस ठाण्यात माहिती देऊन अधिक कुमक बोलावून घेतली. सुमारे पाऊण तास दगडफेक सुरू होती. दंगलखोरांनी पोलीस वाहनावर देखील दगड मारले. रात्री साडेअकरा वाजता परिस्थिती पूर्णपणे पोलिसांच्या नियंत्रणात आली. यांनतर सपकाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन्ही गटातील २९ जणांवर रामानंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दंगलखोरांची समजूत काढत असताना पोलीस कर्मचारी संजय सपकाळे यांच्यावरही दगडफेक झाली. त्यांच्या डोक्याला देखील एक दगड लागला. सुदैवाने त्यांनी हेल्मेट घातलेले असल्यामुळे दुखापत झाली नाही. पाठीत काही दगड लागल्यामुळे मुकामार बसला. पोलीस अधीक्षक डॉ. प्रवीण मुंढे, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत गवळी, सहाय्यक पोलीस अधीक्षक कुमार चिंथा यांनी शनिवारी रात्री व आज रविवारी या परिसरात भेट देऊन पाहणी केली. २९ जणांविरुद्ध दंगलीचा गुन्हा या दंगली प्रकरणी २९ जणांवर रामानंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पैकी दानिश पिंजारी, समीर शेख, सनी उमप, बारकू भोई, लखन भोई व राम भोई या सहा जणांना अटक करण्यात आली आहे.

## आर्यन खानसह दोघांना कोर्टाने दिला दणका; 7 ऑक्टोबरपर्यंत NCB कोठडी



मुंबई - NCB ने शनिवारी रात्री रेव्ह पार्टीवर केलेल्या कारवाईत बॉलीवूड सुपरस्टार शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान याला अटक करण्यात आलं असून त्याच्यासह इतर दोघांना ७ ऑक्टोबरपर्यंत एनसीबी कोठडी सुनावण्यात आली. त्यामुळे शाहरुखच्या लेकाला मोठा दणका कोर्टाने दिला आहे. कालची रात्र एनसीबी कोठडीत घालवली. आता तीन रात्री कोठडीत काढाव्या लागणार आहे. आर्यन खान, अरबाज मर्चंट आणि मुनमुन धमेचा या तिघांच्या तीन रात्री एनसीबी कोठडीत असणार आहेत. आर्यनकडे ड्रग्ज सापडलं नाही. तसेच त्याला पाहुणा म्हणून पार्टीत नेलं होतं, आर्यनची बाजू मांडणारे वकील सतीश मानेशिंदे यांचा कोर्टात दावा केला तर अरबाजकडे 6 ग्रॅम चरस सापडलं असा एनसीबीच्या वकिलांनी कोर्टात दावा केला. कोर्टात सुनावणीदरम्यान क्रूझ ड्रग्ज पार्टीचं आंतरराष्ट्रीय कनेक्शन असल्याचा एनसीबीकडून दावा करण्यात आला,

## पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते यांच्या

दोन नवीन पोलीस ठाण्यांचे उद्धाटन करण्याचे नियोजीत केले असून दिनांक ०२/१०/२०२१ रोजी तुळींज पोलीस ठाणे कार्यक्षेत्राचे विभाजन करून आचोळे या नवीन पोलीस ठाण्याचे उद्धाटन करण्यात आले आहे. नवीन पोलीस ठाण्याची निर्मीती झाल्याने सदर भागामध्ये गुन्हेगारीवर नियंत्रण येवून गुन्हे उघडकीस येण्याचे प्रमाण नक्कीच वाढणार आहे. आचोळे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक श्री. चंद्रकांत सरोदे यांची नेमणूक करण्यात आलेली असून आचोळे पोलीस ठाणेचा संपर्क क्रमांक २५०-२९९०९५५ असा आहे. सदर पोलीस स्टेशनच्या उद्धाटन प्रसंगी मा. पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते, मा. अपर पोलीस आयुक्त श्री एस. जयकुमार, मा. पोलीस उपआयुक्त डॉ. श्री महेश पाटील, श्री विजयकांत सागर, श्री संजयकुमार पाटील, श्री प्रशांत वाघुडे व इतर पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार उपस्थित होते.

## वाहन चोरणाऱ्या अट्टल गुन्हेगारांस पृष्ठ १ वरुन

यांनी गुन्हयातील आरोपी व चोरीस गेलेल्या मालाचा शोध घेत असतांना आरोपी १) मेहताब मोहम्मद वजीर आलम वय २१ वर्षे रा. वाकणपाडा, नालासोपारा पुर्व २) राजु बुधराम गुप्ता वय २३ वर्षे रा. वाकणपाडा, नालासोपारा पुर्व ३) रजत बुधराम गुप्ता रा. वाकणपाडा, नालासोपारा पुर्व, ४) संतोष कांती शिंदे वय २१ वर्षे रा. नायगाव पुर्व यांना चौकशी करीत ताब्यात घेण्यात आले व त्यांना विश्वासात घेऊन त्यांचेकडे कौशल्याने तपास केला असता एकुण ७ गुन्हे केल्याचे त्यांनी वालीव पोलीस पथकासमोर कबूल केले . नमुद अटक आरोपी यांच्याकडून कडुन एकुण ८ मोटार सायकल, १ टेम्पो असा एकुण ६,१५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वरील उल्लेखनिय कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पो.उप.आयुक्त, परि-२ वसई, श्री. अमोल मांडवे, सहा.पो.आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वपोनी श्री. कैलास बर्वे, पोनि. श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, सपोनि/ज्ञानेश फडतरे, पो.अंम. मुकेश पवार, योगेश देशमुख, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, अनिल सोनवणे, राजेंद्र फड, सतिष गांगुर्डे, पो.अंम. विनेश कोकणी, सचिन बलीद, बालाजी गायकवाड, यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.


## मोटारसायकल चोरणाऱ्या टोळीस

चोरी केल्याची त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी मिरारोड पोलीस ठाणे येथे जावून तक्रार केली असून त्यानुसार त्या अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने गुन्हे प्रकटिकरण कक्ष-१, यांनी घटनास्थळावरुन तांत्रिक पुरावे व मिळालेल्या गोपनीय बातमीच्या आधारे सदर प्रकारचे गुन्हे करणारे संशईत इसम १) अय्युब अली बच्चा मियाँ अली वय २८, रा. मिरारोड पुर्व २) इस्माईल अस्लम साह वय २३ रा. काशिमिरा ३) अलीसा दौलत हिवाळे वय २१, रा. काशिमिरा यांना दिनांक २२/०९/२०२१ रोजी ताब्यात घेण्यात आले व त्यांची अधिक तपासणी केली असता त्यांनी मिरा-भाईंदर व मुंबई परिसरातून १० मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली . त्यानंतर त्यांनी दिलेल्या जबाबानुसार त्यांच्याकडून १० मोटारसायकल, २ मोबाईल व मोटारसायकल चोरी करण्यासाठी वापरलेली कटर व इतर साहित्य असे ४,६०,४७०/-रुपये किंमतीचा मुद्देमाला जप्त करण्यात आला आहे. अश्या प्रकारे पोलीस तपासादरम्यान आरोपीं यांनीं मिरारोड, काशिमिरा, नवघर व एम एच बी पोलीस ठाण्यातील वाहन चोरीचे एकुण ७ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. अविराज कुराडे, सपोनि. किशोर टोपले, पोउपनि. हितेंद्र विचारे, पुष्पराज कुराडे, सहा.पोउपनी. महादेव पाठक, राजु तांबे, पोहवा संदिप शिंदे, किशोर वाडिले, अर्जुन जाधव, संजय शिंदे, अविनाश गरजे, पोना पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, सचिन सावंत, प्रशांत विसपुते, पोशि विकास राजपुत सर्व नेमणुक गुन्हे प्रकटिकरण शाखा १ काशिमिरा यांनी पार पाडली आहे.

## ज्या आजीने लाड पुरविला, हवं तेव्हा सर्व दिलं, माया केली, त्याच आजीच्या जीवावर उठला, पुण्यातील संतापजनक घटना

पुणे : आपल्यावर चांगले संस्कार व्हावे म्हणून लहानपणी आपले आई-वडील आपल्याला बऱ्याचदा धपाटे देतात. अर्थात त्यामागे त्यांचा हेतू हा चांगलाच असतो. आपल्याला चांगली शिस्त लागावी म्हणून त्यांचा खटाटोप असतो. पण बऱ्याचदा आपले आजी-आजोबा आपल्याला त्यांच्यापासून वाचवतात. ते आपल्या आई-वडिलांची समजूत काढतात. याशिवाय त्यांचं नातवंडांवर प्रचंड प्रेम असतं. मुद्दलपेक्षा व्याज जास्त गोड लागतं, अशी एक म्हण आहे. अगदी तसंच आपल्या मुला-मुलींपेक्षा त्यांची मुलं म्हणजे नातवंड त्यांना जास्त जवळची वाटतात. त्यामुळे अनेक आजी-आजोंबाकडून नातवंडांचे लाड पुरवले जातात. पण काही नातवंड हे जास्त लाड पुरविल्याने त्यांना त्यांची किंमत राहत नाही. ते इतके कठोर होतात की आपण काय करतो याचं देखील त्यांना भान राहत नाही. अशीच काहिशी घटना पुण्यात घडली आहे. नेमकं प्रकरण काय? पुण्यात ज्या आजीने नातवाला लहानपणापासून सर्व गोष्टी दिल्या, त्याचा हट्ट पुरवला त्याच नातवानं आजीसोबत अमानुष कृत्य केलं. त्याने आजीला प्रचंड मारहाण केली. विशेष म्हणजे त्याने चाकून तिच्यावर हल्ला करत जीवे मारण्याचा देखील प्रयत्न केला. त्यामुळे पीडित आजी ही आतून खचली आहे. आपला नातू आपल्यासोबत पुन्हा असं कृत्य करायला नको म्हणून तिने




थेट पोलीस ठाण्यात धाव घेतली आहे. पीडित 56 वर्षीय आजीची तक्रार ऐकल्यानंतर पोलीसही हैराण झाले. दरम्यान, आजीने आपल्या नातवाचा इतका लाड पुरवायला नको होता, असंही मत आता संबंधित परिसरातील नागरिकांकडून व्यक्त केलं जात आहे. आरोपीचा आजीकडे पैशांसाठी वारंवार हट्ट

पीडित आजी ही पुण्याच्या लोहियानगर परिसरात वास्तव्याला आहे. या आजीच्या 18 वर्षीय नातवाला वेगवेगळ्या प्रकारची व्यसनं आहेत. याशिवाय तो काहीच कामधंदा करत नाही. तो शिक्षणाकडेही लक्ष देत नाही. तो आपल्या आजीकडे पैशांचा हट्ट करतो. त्याच्या हट्टाला बळी पडून आजी त्याला पैसे द्यायची. पण त्या पैशातून आरोपी वेगवेगळ्या प्रकारच्या नशा करायचा. त्याच्या या कृत्यामुळे त्याच्या घरातील इतर सदस्यही त्रस्त झाले होते. विशेष म्हणजे तो आजीकडे येऊन तिला पैशांसाठी खूप सतवायचा. आरोपी नातवाचा आजीवर चाकूने हल्ला पीडित आजीने केलेल्या तक्रारीनुसार तिच्या मुलीचा मुलगा म्हणजेच तिचा 18 वर्षीय नातू हा शनिवारी (2 ऑक्टोबर) तिच्या घरी आला. तो नशेसाठी आपल्या आजीकडे पैसे मागू लागला. पण आजीने त्याला पैसे देण्यास नकार दिला. आजीच्या नकाराने तो इतका रागावला की त्याने थेट आजीवर हल्ला केला. त्याने आजीला थेट बांबूने मारहाण करण्यास सुरुवात केली.

## ठाकरे सरकार झाले अनाथांचे आधार पृष्ठ १ वरुन

खात्यात 5 लाख रुपये जमा केले असल्याची माहिती, राज्याच्या महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी दिली आहे. कोरोना महामारीमुळे गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत राज्यातील विविध जिल्ह्यातील शेकडो बालके आई वडिलांचे छत्र हरपल्याने अनाथ झाली आहेत. अशा बालकांच्या भविष्यासाठी, त्यांच्या शिक्षणासाठी, एकूणच त्यांच्या संरक्षणासाठी काही आर्थिक तरतूद करणे गरजेचे होते, यासाठी महिला बाल विकास विभागाच्यावतीने ॲड. यशोमती ठाकूर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्यानंतर कोविड महामारीत अनाथ झालेल्या बालकांच्या खात्यामध्ये प्रत्येकी 5 लाख रुपये जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयानुसार नुकतेच राज्यातील 306 अनाथ बालकांच्या खात्यात सुमारे 15 कोटी 30 लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. तसंच आतापर्यंत कोरोनामुळे अनाथ बालकांची राज्यातील एकूण संख्या सुमारे सहाशे इतकी असून उर्वरित बालकांच्या खात्यातही लवकरच पैसे जमा करण्यात येतील, अशी माहितीही ठाकूर यांनी दिली आहे. राज्यातील गोंदिया, चंद्रपूर, सांगली, वर्धा, सोलापूर रायगड आलिबाग, रत्नागिरी, नाशिक, अमरावती आणि पुणे, नागपूर अशा विविध 24 जिल्ह्यांमधील बालकांच्या खात्यात पैसे वर्ग झाल्याचा तपशील विभागाकडे नुकताच प्राप्त झाला आहे. यामुळे या बालकांना काही प्रमाणामध्ये आर्थिक सुरक्षितता देता आली असून विविध योजनांच्या माध्यमातून या बालकांच्या शिक्षण आणि संगोपनासाठी प्रयत्न केले जातील असेही, ॲड. ठाकूर यांनी यावेळी सांगितलं.

## पोलीस आयुक्तालय वर्धापनदिनी

व २४ मोबाईल असा एकूण १४,३६,०००/- रूपये किंमतीचा १४ गुन्हयांमधील मुद्देमाल कायदेशिर प्रक्रिया पुर्ण करून तक्रादार यांना परत देण्यात आला आहे. सदरचा कार्यक्रम हा वरिष्ठांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे तुळींज पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र कांबळे यांचे हस्ते पार पडला आहे. त्याचप्रमाणे माणिकपुर पोलीस स्टेशन, अर्नाळा पोलीस स्टेशनच्या वतीने देखील दाखल गुन्हयातील मुद्देमाल फिर्यादी यांना परत देण्यात आला. तक्रारदार यांना त्यांचे सोन्याचे दागीने, मोटारसायकल, कार, रिक्षा व गहाळ मोबाईल परत मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.


## पृष्ठ १ वरुन


### शाळा परत बंद करायच्या नाहीत, त्यासाठी...

शाळा सुरू करण्याचा निर्णय घेणे कठीण होता' असं मुख्यमंत्री म्हणाले. शाळा सुरू करतांना वर्ग खोल्यांची दारे बंद नसावीत, हवा खेळती असावी, शाळेंचे निर्जंतुकीकरण करून घ्यावे. निर्जंतुकीकरण करताना मुलांच्या आरोग्याला अपाय होणार नाही याची देखील काळजी घ्यावी, असेही मुख्यमंत्र्यांनी आवर्जून सांगितलं. आपल्या पाल्याची जबाबदारी आपण स्वतः घ्या. पावसाळयामुळे तसंच इतर अनेक साथीचे रोग येत आहेत. त्यामुळे प्रकृतीकडे लक्ष ठेवावे. शिक्षकांना बरे वाटत नसेल आणि शंका आल्यास लगेच कोरोना चाचणी करून घ्यावी अशी सर्व पालक आणि शिक्षकांना या निमित्ताने मुख्यमंत्र्यांनी विनंती केली. तर, आजपासून शाळा सुरू होत असल्या तरी काही दिवस मुलांशी भावनिक पातळीवर संवाद साधल्या जाणार आहे. प्रदीर्घ कालावधीसाठी शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याची शैक्षणिक गरज,त्याच्याजवळ शिक्षण घेण्यासाठी उपलब्ध असलेली शैक्षणिक साधन सुविधांनुसार त्याच्या संपादणूक पातळीनुसार त्याची गुणवत्ता वृद्धीसाठी नियोजनपूर्वक प्रयत्न करण्यात येणार आहेत, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी दिली. 'ग्रामीण भागातील पाचवी ते बारावीचे आणि शहरी भागातील आठवी ते बारावीचे वर्ग आजपासून सुरू होत आहेत. मागील काही महिन्यांमध्ये आपण अनेकदा शाळा सुरु करण्याबाबतचे प्रयत्न केले पण कोविड -१९ ची तीव्रता लक्षात घेवून विद्यार्थी व शिक्षकांच्या आरोग्याचा विचार करून आपण प्रत्यक्षपणे शाळा सुरु करू शकलो नाही, असंही गायकवाड यांनी स्पष्ट केलं.

### मिरा भाईंदर मध्ये महिलांसाठी

वाढती लोकसंख्या व महिला हिसांचार/कौटुबिक हिसांचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभुमीवर महिलांच्या तक्रारींना प्राधान्य देवून त्यांचे समुपदेशन करुन मानसिक आधार देणे व त्यांच्या तक्रारीचे तात्काळ निवारण करणे यासाठी मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांच्या संकल्पनेतुन या कक्षाची स्थापना करण्यात आली. भरोसा कक्षाच्या माध्यमातून मुख्यत्वेकरुन महिलांशी संबंधित तक्रारींचे निवारण केले जाणार आहे. तसेच कौटुंबिक वाद-विवाद/कलह समोपचाराने कसे सोडवता येईल? यादृष्टीने भरोसा सेल कक्षामध्ये महिला पोलीस अधिकारी व महिला पोलीस अंमलदार काम पाहणार आहेत. मिरा-भाईंदर परिमंडळ ०१ मधील पोलीस ठाण्यात महिलांच्या संबंधित तक्रारी भरोसा कक्षाकडे पाठविण्यात येणार आहेत. कक्षामध्ये महिला पोलीस अधिकारी, समुपदेशक, मानसोपचार तज्ञ, एन.जी.ओ., एम.एस.डब्ल्यु., वकिल व संरक्षण अधिकारी यांचा सामावेश असुन महिलांच्या समस्या जाणुन घेवुन समोपचाराने वाद मिटवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

सदर कार्याक्रमासाठी मा. श्री एस. जयकुमार, अप्पर पोलीस आयुक्त, डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), सहा. पोलीस आयुक्त, श्री शशिकांत भोसले, श्री. रामचंद्र देशमुख, श्री शांतीलाल जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संपतराव पाटील, श्री. मुकुटलाल पाटील, श्री. मिलिंद देसाई, श्री. प्रशांत लांगी, मसपोनि. तेजश्री शिंदे-भरोसा सेल, पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

### गुन्हे शाखा कक्ष-१ काशिमिरा

इग्निशन स्विच, वाहनाच्या चाव्या, बँकेचे चेक, पासबुक, स्क्रू ड्रायवर असे मिळून आले. सदर आरोपीस अटक करुन त्याची सखोल विचारपूस केली असता त्याच्याकडून एकूण १,६०,४००/- असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

तसेच दिनांक २९/०७/२०२१ रोजी दुपारी १४:२० वाजताच्या सुमारास दिलीप इस्माईल लोंढे वय ६०, रा. मिरारोड पुर्व यांनी पार्क करून ठेवलेल्या कारची कोणीतरी अज्ञात इसमाने काच फोडून डाव्या सिटवरील प्लास्टीकच्या पिशवीत गुंडाळून ठेवलेले एकुण १,००,०००/- रुपये रोख रक्कम चोरुन नेल्याने काशिमिरा पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदरच्या गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदाराचे मार्फतीने मिळालेल्या बातमीच्या आधारे १) सॅम्युअल हॅरैल परेरा वय ५२ रा. कासारवडवली, ठाणे व २) सुभाष नागेश गायकवाड वय ३८ रा. दौंड जि. पुणे अशांना दिनांक २४/०९/२०२१ रोजी मिरारोड पुर्व कनाकिया रोड येथून ताब्यात घेवून सदर गुन्हयाच्या बाबतीत विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबुली दिली त्यांना सदर गुन्हयात अटक करून गुन्हयात चोरी केलेल्या रकमेपैकी ५०,०००/- रुपये व गुन्हयात वापरेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. अविराज कुराडे, सपोनि. किशोर टोपले, पोउपनि. हितेंद्र विचारे, पुष्पराज सुर्वे, सहा.पोउपनी. महादेव पाठक, राजु तांबे, पोहवा संदिप शिंदे, किशोर वाडिले, अर्जुन जाधव, संजय शिंदे, अविनाश गरजे, पोना पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, सचिन सावंत, प्रशांत विसपुते, पोशि विकास राजपुत सर्व नेमणुक गुन्हे प्रकटिकरण शाखा १ काशिमिरा यांनी पार पाडली आहे.

### पश्चिम उपनगरांत बुधवारी काही ठिकाणी पाणी बंद

वाजेपर्यंत पाणी पुरवठा खंडित राहील. या दिवशी सकाळी ६.३० ते ९ या वेळेत एच पश्चिम विभागात कमी दाबाने पाणी पुरवठा होईल. जुहू कोळीवाडय़ात सकाळी १० ते दुपारी १२.१५, चार बंगला येथे दुपारी १२.१५ ते २.१०, मोरागाव आणि पार्ला सप्लाय येथे दुपारी २.२३ ते ४.५५ या वेळेत कमी दाबाने पाणी पुरवठा होईल. पार्ला आऊटलेट येथे दुपारी ४.३० ते संध्याकाळी ७.५०, एन. एस. फडके मार्ग, पूर्ण विलेपार्ले पूर्व भाग येथे संध्याकाळी ५ ते रात्री ८ या वेळेत पाणीपुरवठा खंडित राहील. रिलायन्स मोगरा, जुना नागरदास मार्ग, नवीन नागरदास मार्ग, मोगरापाडा रात्री ८ ते १०.३० या वेळेत कमी दाबाने पाणी पुरवठा होईल.

### गुन्हे शाखा कक्ष -3 विरार यांच्या

तामिळनाडु ४) रोहीत रामु तमिलन वय- १८ वर्षे, रा. राज्य- तामिळनाडु या ४ आरोपींना दिनांक ३०/०९/२०२१ रोजी अटक करण्यात आले. पोलीस तपासादरम्यान आरोपी यांनी सदरचे गुन्हे हे त्यांचे अन्य दोन साथीदार यांच्या मदतीने केले असल्याचे कबूल केले .सदर आरोपी यांच्या कडून चोरीस गेलेले ६ लॅपटॉप व ३८ मोबाईल फोन असा एकुण ५,२३,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपींची अधिक चौकशी केली असता त्यांच्या नावावर अश्या प्रकारचे एकूण १७ गुन्हे असल्याचे उघडकीस आले. आरोपी हे मुळचे जिल्हा- वैल्लोर, राज्य- तामिळनाडू येथील रहिवासी आहेत. मुक बधिर असण्याचा बनाव करुन मदत मागण्याच्या हेतुने ईमारतीमध्ये अथवा घरामध्ये प्रवेश करुन घरातील व्यक्तीचे लक्ष चुकवून सकाळच्या वेळी घरामध्ये प्रवेश करुन घरातील मोबाईल फोन, लॅपटॉप, सोन्याचे दागिने, मौल्यवान वस्तू चोरी करतात असे पोलीस चौकशीत त्यांनी सांगितले .

अटक आरोपी व त्यांचे ईतर साथीदार यांच्याविरुद्ध राज्यातील विवीध पोलीस ठाण्यामध्ये मध्ये चोरीचे गुन्हे दाखल आहेत. आरोपी यांना पुढील कारवाई करीता अर्नाळा पोलीस ठाणे येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. या पुढील तपास अर्नाळा पोलीस ठाणे करीत आहे. वरील कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, पोउपनिरी. शिवाजी खाडे, पोउपनिरी. उमेश भागवत, सफौ.

अनिल वेळे, पो.हवा. अशोक पाटील, पो.ना. प्रदीप टक्के, पो.ना.मुकेश तटकरे, पो.ना. सागर बारवकर, पो.ना. मनोज सकपाळ, पोना. शंकर शिंदे, पोना. सचिन घेरे, पोशि. राकेश पवार, सर्व नेम- गुन्हे शाखा, यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

## संपादकीय...



### स्वास्थ्य कार्ड ही योजना उत्तम खरी; पण मूळ दुखणं आहे ते आरोग्य व्यवस्थेच्या सक्षमीकरणाचे

विकसित देशात दीर्घकाळ काम करून भारतात आलेले काही मोजके डॉक्टर्स मला माहीत आहेत. त्यांच्याकडे जाताना कोणताही कागद, चाचण्यांचे अहवाल घेऊन जावे लागत नाही. तुम्ही त्यांचे रुग्ण असाल तर सर्व रेकॉर्ड त्यांच्याकडे उपलब्ध असते. सल्ल्यासाठी गेल्यावर फक्त तुमचा रुग्ण क्रमांक सांगायचा. अनेक डॉक्टर्सनी स्वत:चे ॲप विकसित करून घेतले आहेत. त्यावर तुमची समस्या सांगून तुम्ही ऑनलाइन सल्लाही घेऊ शकता.या डॉक्टरांच्या कार्यप्रणालीकडे पाहून मला नेहमी असे वाटत असे की संपूर्ण भारतात ही अशी व्यवस्था का करता येऊ नये? त्यासाठी प्रयत्न का केले जात नाहीत? १५ ऑगस्ट २० ला पंतप्रधान मोदी यांनी देशाच्या काही भागासाठी डिजिटल स्वास्थ्य कार्ड योजनेचा प्रारंभ केला तेव्हा मला वाटले होते, की या योजनेचा अतिशय सकारात्मक परिणाम होईल. तसे झालेही. केंद्रशासित प्रदेश अंदमान निकोबार, पुड्डुचेरी, दादरा नगर हवेली, दमण दीव, लक्षद्वीप, लडाख आणि चंदीगडमध्ये मिळून १ लाख डिजिटल स्वास्थ्य कार्डस् तयार झाली. त्याचे चांगले परिणामही दिसले. त्यानंतर २७ सप्टेंबर २०२१ ला ही स्वास्थ्य कार्डस् पूर्ण देशात तयार करण्याची योजना सुरू झाली. सामान्यत: आपल्या देशात कोणतीही नवी योजना सुरू होताच त्यावर अनेक प्रश्न उपस्थित केले जातात.हल्लीचा पहिला प्रश्न हा, की यासाठी एकत्र केल्या जाणाऱ्या आमच्या माहितीचे (डेटा) काय होणार..? हा डेटा पूर्ण सुरक्षित राहील, डॉक्टर किंवा सेवा देणाऱ्या व्यक्ती वगळून अन्य कोणाला तो मिळणार नाही, असे यावर सरकारने स्पष्ट केले आहे. आधार कार्डावर जशी तुमची माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध असते तशीच या स्वास्थ्य कार्डावर असेल. आपल्याला डॉक्टरकडे जाताना जुनी कागदपत्रे घेऊन जावे लागणार नाही. माहिती डिजिटल स्वरूपात सर्व्हरवर उपलब्ध असेल. कार्डाचा नंबर टाकला की सगळी माहिती क्षणात समोर येईल. या उपक्रमातून देशातील सर्व डॉक्टर्स इस्पितळे आणि सर्व प्रकारच्या वैद्यकीय सुविधा देणारे आयुष्मान भारतच्या केंद्रीय सर्व्हरशी जोडले जातील. आपण एखाद्या डॉक्टरला आपली प्रकृती दाखवली तर संबंधित कागद आपोआप त्यांच्या क्लिनिकमधून आपल्या स्वास्थ्य कार्डावर जाईल. घरबसल्या चांगल्या डॉक्टरकडून सल्ला मिळवता येईल, हा या कार्डचा आणखी एक मोठा फायदा.विशेषत: आणीबाणीच्या प्रसंगी हे कार्ड अल्लादिनच्या दिव्यासारखे उपयोगी पडेल. गंभीर अपघातानंतर एखाद्याला अकस्मात इस्पितळात भरती केले जाते तेव्हा त्याचा रक्तगट लगेच कळत नाही. त्याला मधुमेह किंवा अन्य कोणते आजार आहेत, एखाद्या औषधाची ॲलर्जी आहे का, हे कळत नाही. उपचार सुरू करण्यापूर्वी ही माहिती जमवण्यात वेळ जातो. अपघातग्रस्ताजवळ स्वास्थ्य कार्ड असेल तर लगेच उपचार सुरू करता येतील. देशातील प्रत्येकासाठी स्वास्थ्य कार्ड ही योजना उत्तम खरी; पण या देशाचे मूळ दुखणे आहे ते आरोग्य व्यवस्थेच्या सक्षमीकरणाचे! कोविड काळात या व्यवस्थांचे पांगळेपण आपण अनुभवले आहे. खुर्द, बुद्रुक गावांमध्ये उपचार सोडा, कोविडच्या चाचण्या करण्याची व्यवस्था नव्हती हे आपण पाहिले आहे.बड्या शहरांमध्ये रुग्ण ऑक्सिजनसाठी तळमळताना आपण पाहिले आहेत. पाहावे तिथे ऑक्सिजनची मारामार आणि औषधांचा तुटवडा हेच चित्र होते. रुग्णांची बेसुमार लूट झाली. लोक किती हताश होते, हे अवघ्या देशाने पाहिले आहे. कोविड काळाने सरकारलाही हलवून जागे केले असणार, हे नक्की. साधनेच नसल्यामुळे रुग्णांचे हाल होणे ही एक बाजू झाली; पण साधने असूनही ती वेळेवर उपलब्ध होऊ शकली नाहीत. हे अधिक गंभीर चित्र! साधने होती, सुविधा होत्या; याचा अर्थ नागरिकांकडून वसूल केलेल्या करातून हजारो कोटी रुपये खर्चून सरकारने मोठमोठी इस्पितळे बांधली, उपकरणे खरेदी केली; पण नागरिकांचे जीव वाचवण्यासाठी त्या सुविधांची गरज होती, तेव्हा काय झाले? लोकांना सुविधा मिळाल्या? गरिबांना औषधे मिळाली? हतबल डॉक्टर चिठ्ठी देऊन रुग्णाला सांगतात, ही औषधे इथे नाहीत, बाहेरून आणा! वैद्यकीय महाविद्यालयाच्या इस्पितळातले ऑपरेशन थिएटर बंद असते, म्हणून मग डॉक्टर बाहेर जाऊन शस्त्रक्रिया करतात. कागदावरच्या योजनेत लिहिलेले असते की गर्भिणी आणि नवजात मातेला आणि बाळालाही योग्य ते उपचार-पोषण मिळाले पाहिजे; पण प्रत्येकात काय अनुभव असतो? किती मातांना आणि बालकांना या सरकारी सुविधा मिळतात? हे नवे स्वास्थ्य कार्ड हे सारे मिळवून देऊ शकणार आहे का?देशाच्या आरोग्य व्यवस्थेवरील निधीमध्ये भरीव वाढ होणार नाही आणि हा निधी खर्चण्याची जबाबदारी असलेल्या प्रत्येकाचे उत्तरदायित्व निश्चित केले जाणार नाही, तोवर परिस्थितीत फार फरक पडेल, असे मला वाटत नाही. कोविड काळात एकेका इंजेक्शनसाठी रुग्णाच्या नातेवाइकांची कशी ससेहोलपट झाली, हे आपण पाहिले आहे. देशभर जो औषधांचा काळाबाजार झाला, त्याची कसून चौकशी झाली पाहिजे. सरकारने त्याबाबत श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली पाहिजे. आणखी एक मुद्दा : हे सरकार आणखी किती कार्डस् जारी करणार आहे? आधार कार्ड आहे, पॅन कार्ड आहे, रेशन कार्ड आहे, ड्रायव्हिंग लायसन्स आहे. ही सगळी कार्डस् एकच का नाही केली जात? प्रश्न खूप आहेत. या नव्या स्वास्थ्य कार्डामुळे देशातल्या सामान्य नागरिकाला आरोग्यासंबंधीचा अधिकार मिळतो की नाही, हे अनुभवानेच कळेल!

# दुटप्पीपणाचा कहर

राजधानी दिल्ली आणि परिसरात ठाण देऊन बसलेल्या शेतकरी आंदोलकांची एकेक नवी भूमिका केवळ सामान्य नागरिकांनाच नव्हे तर आता सर्वोच्च न्यायालयालाही बुचकळ्यात टाकत आहे. आंदोलन करायचे म्हणजे जनजीवन विस्कळीत करून टाकायचे आणि सामान्य माणसाच्या संयमाची परीक्षा पाहावयची, असेच बहुतेक आंदोलनांच्या नेत्यांना वाटत असते. अशा आंदोलनात कित्येकदा मग संघर्ष होतो, रक्तपात होतो आणि मग तर आंदोलनाच्या नेत्यांना पोळी भाजण्यासाठी आयतीच धग मिळते. राजधानीत सिंधू आणि टिकरी अशा दोन सीमाक्षेत्रांमध्ये शेतकरी आंदोलक ठिय्या देऊन बसले आहेत. यातला बराचसा भाग हा हरयाणा राज्याच्या हद्दीत येतो. त्यामुळे, हरयाणा सरकार या प्रकरणात आता सर्वोच्च न्यायालयात आपली बाजू मांडते आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या प्रकरणात काहीशा कडक शब्दांमध्ये आंदोलकांची हजेरी घेतली, हे योग्यच झाले. 'तुम्ही राजधानीचा गळाच घोटत आहात' अशी कठोर भाषा न्यायालयाने वापरली आहे. या आंदोलकांना आता राजधानीत 'जंतर मंतर' येथे आंदोलनास बसावयाचे आहे. या विनंतीबाबत सर्वोच्च न्यायालय यथावकाश योग्य तो निकाल देईलच. मात्र, शेतकरी संघटनांच्या याबाबतच्या दुटप्पी भूमिकेकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने संसदेत मंजूर करवून घेतलेल्या आणि कोणत्याही राज्याला त्यांची अंमलबजावणी सक्तीच्या नसलेल्या तीन कृषी कायद्यांना या आधीच न्यायालयांमध्ये आव्हान देण्यात आले आहे. याचा अर्थ, उद्या न्यायालयाने हे कायदे वैध ठरविले तर सध्या चालू असणाऱ्या आंदोलनाला काहीही अर्थ राहणार नाही. किंबहुना, एकदा हा प्रश्न न्यायालयात नेताक्षणीच शेतकरी संघटनांनी आंदोलनाला पूर्णविराम द्यायला हवा होता. न्यायालयाचा निकाल जर शिरोधार्य असेल तर आंदोलन चालू ठेवणे हे तर्कदुष्ट ठरते. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या विसंगतीकडेही या सुनावणीत लक्ष वेधले आहे. आंदोलक जसे या देशाचे नागरिक असतात आणि त्यांना न्याय मिळणे, हे जसे आवश्यक असते, त्याचप्रमाणे त्यांच्या आंदोलनामुळे त्रास सहन करावे लागणारे लक्षावधी रहिवासी, प्रवासी हेही देशाचे तितकेच महत्त्वाचे नागरिक असतात. मात्र, कोणत्याही आंदोलनामुळे होणारा त्रास सहन करणे, ही जणू नागरिकांची नैतिक जबाबदारीच आहे, अशा थाटात भारतात अनेक दशके आंदोलने केली गेली आहेत. अशा बेछूट, बेपर्वा आणि बेमुदत आंदोलनामुळे किती हाहाकार उडू शकतो, याचा मुंबईइतका दाहक अनुभव दुसऱ्या कुणी घेतला नसेल. शेवटी अशी आंदोलने आंदोलकांच्याही अहिताची ठरतात. सर्वोच्च न्यायालयाने शेतकरी आंदोलनाच्या नेत्यांकडे अंगुलिनिर्देश करून 'नागरिकांना मुक्तपणे फिरता आले नाही, सुरक्षा रक्षकांवर हल्ले झाले, भारतीय जवानांसहित सामान्य प्रवाशांना मारहाण करेपर्यंत मजल गेली, रस्ते व महामार्ग रोखल्याने सारे जनजीवनच वेठीला धरले गेले' या साऱ्यांची जबाबदारी त्यांच्या पदरात टाकली. हे एका परीने योग्य झाले. खरेतर, राजधानीतच शाहीनबाग येथे आंदोलन चालू होते, तेव्हा 'तुम्हाला सरकारने ठरवून दिलेल्या जागीच आंदोलन करावे लागेल. रस्ते असे बेमुदत अडवून तेथे तळ ठोकता येणार नाही' अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने आंदोलकांना खडसावले होते आणि त्यांच्यावरील कारवाईचा मार्ग मोकळा केला होता. हे उदाहरण असताना आणि सर्वोच्च न्यायालयाचा इतका सुस्पष्ट आदेश असताना आंदोलक शेतकरी संघटनांमधील काही घटक इतका आडमुठेपणा करतात, हे खरोखर नवल आहे. या आंदोलनाला वैचारिक आणि बौद्धिक दारुगोळा पुरविणारे देशातील नामांकित विचारवंत आहेत. मग त्यांना तरी सर्वोच्च न्यायालयाची ही लोकहिताची तळमळ का समजू नये? भारताला आंदोलनांची मोठी परंपरा आहे. महात्मा गांधी यांची जयंती नुकतीच झाली. मात्र, आंदोलनातील आत्मक्लेष हे गांधींनी दिलेले तत्त्व जवळपास विरून गेले आहे. या आत्मक्लेषाची दुसरी बाजू आंदोलनात परपीडा होऊ न देणे, ही असते. मात्र, सध्याच्या आंदोलनांमधून आत्मक्लेष जसा अंतर्धान पावला आहे, तसेच परपीडन न करण्याचे सूत्रही कोणी पाळायला तयार नाही. शाहीनबाग आंदोलकांना फटकारताना सर्वोच्च न्यायालयाने 'हे तुमचे सरकार आहे. इंग्रजांचे सरकार असताना अशी आंदोलने चालली असती. मात्र, लोकशाही व लोकनियुक्त सरकार असताना अशी आंदोलने समर्थनीय ठरत नाहीत,' असे निरीक्षण नोंदवले होते. शेतकरी आंदोलक आणि संघटनांना बहुतेक याच निकालपत्राची आठवण करून देण्याची वेळ आली आहे. आंदोलकांचे मुद्दे योग्य आहेत की नाहीत, या मुद्दा इथे नाही. याचे कारण, या कायद्यांची, उपयुक्तता ठरविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने मागेच एक समिती नेमली आहे. या समितीचा अहवाल तरी आंदोलक मान्य करणार आहेत का? यातल्या एका सदस्याने हे कायदे शेतकरी हिताचे असून समितीचा अहवाल लवकरात लवकर जाहीर करावा, असे अलीकडेच म्हटले आहे. उद्या हा अहवाल आंदोलकांच्या बाजूचा नसेल तर राजधानी आणि परिसरात काय चित्र असेल? तेव्हा, 'आम्ही म्हणू तेच आणि तितकेच खरे' असा सत्याग्रह नसतो. उद्या सर्वोच्च न्यायालयाची अनुमती घेऊन केंद्र व हरयाणा सरकारने बळाचा वापर करून आंदोलकांना हटवले तर नव्या हिंसाचाराला निमंत्रण मिळेल. अशा संधींची अनेक जण वाटच पाहात असतात. तेव्हा 'आमच्याकडून न्यायाची अपेक्षा करीत असाल, तर रस्त्यावरचे आंदोलन आटोपते घ्या' हा सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला ऐकण्यात केवळ आंदोलकांचे नव्हे तर देशातील एकंदरीत शेतकऱ्यांचे हित आहे.



## राज्यात 25 टक्के लोकांना दुसरी मात्रा

मुंबई : राज्यात करोना लशीची पहिली मात्रा १८ वर्षांवरील सुमारे ६१ टक्के नागरिकांनी घेतली असली तरी दोन्ही मात्रा पूर्ण केलेल्यांचे प्रमाण सुमारे २५ टक्के इतकेच आहे. राज्यातील निर्बंध टप्प्याटप्प्याने शिथिल होत असताना करोना संक्रमण



वाढू नये आणि विषाणू उत्परिवर्तित होऊ नये म्हणून दोन्ही मात्रा दिलेल्यांचे प्रमाण वाढविणे गरजेचे आहे, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

राज्यात १८ वर्षांवरील सुमारे ९ कोटी १४ लाख नागरिक आहेत. यापैकी ५ कोटी ६१ लाख नागरिकांनी पहिली मात्रा घेतली आहे,

तर दोन्ही मात्रा पूर्ण केलेल्यांची संख्या २ कोटी ३२ लाख आहे. दोन्ही मात्रा पूर्ण केलेल्यांचे प्रमाण तुलनेत कमी आहे.राज्यात सर्वाधिक पहिल्या मात्रेचे सुमारे ८९ टक्के तर दुसऱ्या मात्रेचे सुमारे ४४ टक्के लसीकरण मुंबईत झाले आहे. मुंबईत दोन्ही मात्रा पूर्ण केलेल्यांचे प्रमाण जवळपास ४५ टक्के आहे. त्या खालोखाल भंडारा आणि पुणे जिल्ह्यांचा समावेश आहे. पहिली मात्रा ७० टक्क्य़ांहून अधिक पूर्ण केलेले जिल्हे पुण्यापाठोपाठ सिंधुदुर्गमध्ये पहिल्या मात्रेचे ७८ टक्के तर दुसऱ्या मात्रेचे ३९ टक्के लसीकरण झाले आहे. त्या खालोखाल सातारा, सांगली, गोंदिया आणि कोल्हापूरमध्ये पहिल्या मात्रेचे लसीकरण ७० टक्क्य़ांहून अधिक झाले आहे. परंतु दोन्ही मात्रा पूर्ण झालेल्यांचे प्रमाण ३० टक्के आहे. २१ जिल्ह्यांमध्ये पहिल्या मात्रेचे प्रमाण सुमारे ४० ते ५० टक्के आहे. परंतु दोन्ही मात्रा पूर्ण केलेल्यांचे प्रमाण हे १८ टक्क्य़ांखालीच आहे. यात दोन्ही मात्रा पूर्ण केलेल्यांचे प्रमाण हिंगोली, नांदेड येथे सुमारे १४ टक्के आहे. तर त्या खालोखाल जळगाव, सोलापूर, गडचिरोली, औरंगाबाद आणि यवतमाळमध्ये सुमारे १६ टक्के आहे. राज्यात दुसऱ्या क्रमांकावर सर्वाधिक रुग्णसंख्या ठाण्यात असूनही ठाण्यात मात्र दोन्ही मात्रा पूर्ण केलेल्यांचे प्रमाण २७ टक्केच आहे.

गणेशोत्सवानंतर संसर्गवाढीची शक्यता वर्तविली जात होती. परंतु तसे फारसे झालेले नाही. पुढील काही काळ अशीच रुग्णसंख्या स्थिर राहिली तर आपण ‘एण्डेमिक’कडे जात आहोत असे म्हणता येईल. विषाणू उत्पर्वितित होऊ नये यासाठी दोन्ही मात्रांचे लसीकरण वेगाने व्हावे, असे मत सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञ डॉ. सुभाष साळुंखे यांनी व्यक्त केले.

राज्यात सध्या शाळांसह मंदिरे, सिनेमागृहे टप्प्याटप्प्याने सुरू होत आहेत. पहिली मात्रा ही करोनापासून संरक्षणासाठी पुरेशी नाही. तेव्हा संसर्गाचे प्रमाण वाढू नये यासाठी पुढील एक ते दोन महिन्यांत लसीकरणाच्या दोन्ही मात्रा पूर्ण करण्याची मोहीम वेगाने पुढे नेण्याची आवश्यकता आहे.

## बाईक जाळल्या, हातात तलवारी नाचवणारे सीसीटीव्ही समोर, कल्याणमध्ये गुन्हेगारी शिगेला

कल्याण : कल्याण पूर्वेच्या कोळसेवाडी पोलीस ठाणे हद्दीत रात्रीच्या वेळेत मद्यधुंद तरुणांकडून नागरीकांमध्ये दहशत माजविण्याचा प्रयत्न सुरु आहे. कल्याणच्या शिवाजी कॉलनी परिसरात मद्यधुंद तरुणांनी रात्रीच्या वेळी प्रचंड धुडगूस घातला. यावेळी आरोपींनी परिसरातील महागड्या गाड्या जाळल्या. त्यांच्या या हैदोसात प्रचंड गाड्यांचं नुकसाण झालं आहे. या प्रकारात ज्या गाड्यांचं नुकसाण झालं आहे त्याच्या मालकांनी पोलीस ठाण्यात धाव घेत या प्रकरणाची तक्रार केली आहे. विशेष म्हणजे कल्याणमध्ये या अशाप्रकारच्या घटना वारंवार समोर येत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.





### नेमकं प्रकरण काय?

कल्याण पूर्व भागातील शिवाजी कॉलनी परिसरात रात्री दोन वाजेच्या सुमारास अज्ञात आरोपींकडून चार मोटारसायकल जाळण्यात आल्या आहेत. कोळसेवाडी पोलिसांनी या प्रकरणात तक्रार दाखल केली आहे.

अज्ञात कारणावरुन या गाड्या जाळण्यात आल्या आहेत, असे पोलीस तक्रारीत म्हटले आहे. स्थानिक नागरीकांचा स्पष्ट आरोप आहे की, परिसरातील काही तरुण दहशत माजविण्यासाठी गाड्या जाळत आहेत.

सबंधित प्रकारामुळे परिसरातील महिला जास्त भयभीत झाल्या आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वी कल्याण पूर्व भागात रात्रीच्या वेळी धिंगाणा करणाऱ्या मद्यधुंद तरुणामुळे परिसर जास्त बदनाम झाला आहे.

दहा दिवसांपूर्वीच काही तरुण तलवारी घेऊन रस्त्यावर फिरत असताना दिसून आले होते. या प्रकरणी पोलिसांनी कारवाई केली असली तरी अशा प्रकारच्या मानसिकतेचे अंत होणे अतिशय गरजेचे आहे. कारण लोकांमध्ये आता भीती निर्माण झाली आहे. पोलिसांचे भय या अपराधी कृत्य करणाऱ्यांमध्ये निर्माण करायचे असल्यास पोलिसांनी कठोर कारवाई केली पाहिजे, अशी भावना स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### आरोपींचे सीसीटीव्ही फुटेज व्हायरल

काही दिवसांपूर्वी तरुणांचे हे कृत्य एका सीसीटीव्हीत कैद झाले होते. या सीसीटीव्हीमध्ये तरुणांच्या हातात काठ्या होत्या.

परिसरात उभ्या असलेल्या गाड्यांसह अन्य वस्तूंचे नुकसान करण्यासाठी ते चाळीत फिरत होते. तेच तरुण पुन्हा दुसऱ्या रस्त्याने आले. त्यांनी गाड्या जाळल्या.

तसेच काही दिवसांपूर्वीच कल्याणच्या तीसगाव परिसरातील काही सीसीटीव्ही फुटेजचे व्हिडीओ व्हायरल झाले होते. या व्हिडीओमधील तरुणांच्या हाती तलवारी दिसल्या होत्या. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

### कल्याणमध्ये टवाळखोरांची डेरिंग वाढतेय

कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत गेल्या काही दिवसापासून गुन्हेगारी वाढली आहे. चक्कीनाका, खडेगोळवली, कैलास नगर, चिकणीपाडा या परिसरात रात्रीच्या वेळेस टवाळखोर तरुण विनाकारण नागरिकांना त्रास देतात. रात्रीच्या वेळेस मोठ्या प्रमाणात मद्यधुंद अवस्थेत तरुण घराबाहेर पडतात. दारूच्या नशेत निष्पाप नागरिकांना मारहाण करतात, वाहनांची तोडफोड करतात, पोलीस कारवाई करतात. मात्र या टवाळखोर तरुणांना राजकीय पाठबळ असल्याने पोलिसांकडून ठोस पावले उचलण्यात अडचणी येतात. यामुळे तरुणांची डेरिंग वाढते आणि या तरुणांकडून गैरप्रकार घडतात.

### चिकणीपाड्यातही मद्यधुंद तरुणांचा हैदोस

कल्याणच्या चिकणीपाडा परिसरात काही दिवसांपूर्वी देखील अशीच एक घटना घडली होती. दोन तरुण रात्रीच्या वेळी मद्यधुंद अवस्थेत आले.

हे दोघे एका तरुणाच्या शोधात होते. तो सापडला नाही. या दोघांनी दारुच्या नशेत दहशत माजवण्यासाठी परिसरात उभ्या असलेल्या दुचाकी आणि चारचाकी वाहनांना निशाणा केला. त्यांनी बाईक, कार, रिक्षांची तोडफोड केली. तसेच एका तरुणाला जखमी केले.

## अनधिकृतरित्या अंमली पदार्थाची विक्री करतांना नायगांव येथून 03 नायजेरीयन नागरिकांस अटक




नायगांव : दिनांक ०२/१०/२०२१ रोजी मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, नायगांव (पुर्व), डॉन बॉस्को स्कुल जवळील साई दर्शन बिल्डींग मध्ये नायजेरीयन नागरीक हे अंमली पदार्थ विक्रीकरीता घेवून आलेले आहेत.सदर मिळालेली बातमी वरिष्ठांना कळवुन डॉ. श्री महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांच्या परवानगीने व मार्गदर्शनाप्रमाणे सदर ठिकाणी छापा टाकण्यात आला . त्या दरम्यान नायगांव (पुर्व), डॉन बॉस्को स्कुल जवळील साई दर्शन बिल्डींग मधील ए विंग, रुम.क्र.४०३ मध्ये राहणारे १) ओशीता डोझी चिबुझी वय ३६ वर्षे, मुळ रा., देश-नायजेरीया २) ईझे इकेने वय २९ वर्षे, रा. मुळ रा. देश-नायजेरीया ३) ईबुका किंग्सले अच्युनिलो वय ३२ वर्षे, रा. मुळ रा. नायजेरीया यांच्या जवळ एकुण ११२६ ग्रॅम वजनाचा केटामाईन नावाचा व १३ ग्रॅम वजनाचा मॅफेड्रॉन नावाचा एकुण १०,५६,०००/-रु. किंमतीचा अंमली पदार्थ मिळुन आला. हे अंमली पदार्थ केटामाईन व मॅफेड्रॉन जप्त करण्यात आलेले असुन नायजेरीयन आरोपींविरुध्द अंमली पदार्थ कायदया नुसार वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयात तीन आरोपी यांना अटक करण्यात आली आहे. याचा अधिक पुढील तपास वालीव पोलीस ठाणे करीत आहे सदरची कारवाई श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांचे परवानगीने व श्री. रामचंद्र देशमुख सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. देवीदास हंडोरे, सपोनि. श्री. विलास कुटे, मसपोनि. तेजश्री शिंदे नेम-भरोसा सेल, पो.हवा. धनाजी इंगळे, पो.ना.पवन पाटील, पो.शि. चव्हाण, अजय यादव, विष्णुदेव घरबुडे, मपोशि. जाधव, पोना/विनोद राऊत, पो.ना.शिवाजी पाटील, पो.ना. राजाराम काळे नेमणुक-मध्यवर्ती गुन्हे शाखा, पो.ना. रोशन किणी, मपोहवा. डोईफोडे नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा विभाग यांनी केली आहे.

## सर्वसामान्यांना फसविण्याचा अनोखा फंडा, परदेशी चलनाच्या नावाखाली लाखोंचा गंडा, पुण्यात अखेर भामटे गजाआड




पुणे : पुण्यात परदेशी चलनाच्या नावाखाली अनेकांना गंडा घालण्यात आलाय. पुण्यातील बिबवेवाडी पोलिसांनी या टोळीचा पर्दाफाश केलाय. यूएईचे दीरहम चलन स्वस्तामध्ये देण्याच्या आमिषाने फसवणूक करणाऱ्या टोळीला बिबवेवाडी पोलिसांनी अटक केली. या टोळीने शहरात आठ ते दहा जणांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आलंय. पुण्यासह देशातील विविध शहरांत या टोळीने असे गुन्हे केले आहेत. आरोपींकडून आठ ते दहा जणांची फसवणूक महंमद उबईदुल्ला मुदसेर शेख (वय 30), पाखी सुबान मलिक (वय 27), बाबू फुलमिया मुल्ला (वय 32), उस्मान मुतलिफ अली (वय 27), महंमद कामरान खान (वय 28), रिदोई रहीम खान (वय 23) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपी देशातील विविध भागांतील राहणारे आहेत. त्यांचा महाजन नावाचा म्होरक्या असून, तोच गरीब-गरजू लोकांना सोबत घेऊन अशा पद्धतीने देशातील विविध शहरांत गुन्हे करीत आहे. अलीकडे शहरात त्यांनी यूएईचे दीरहम चलन देण्याच्या बहाण्याने फसवणूक करण्यास सुरुवात केली होती. या प्रकरणी आतापर्यंत तीन गुन्हे दाखल झाले असून, या टोळीने आठ ते दहा जणांची फसवणूक केल्याचे तपासात समोर आले आहे.बिबवेवाडीच्या

व्यावसायिकाला 3 लाखांचा गंडा

बिबवेवाडी येथील व्यावसायिकाला कमी किंमतीत दीरहम देण्याच्या आमिषाने तीन लाख रुपयांचा गंडा घालण्यात आला. या गुन्ह्यात बिबवेवाडी पोलीस या टोळीच्या मागावर होते. त्यावेळी ही टोळी शहरातील एका व्यक्तीला फसविणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला. या टोळीने आठ ते दहा गुन्हे केल्याचे समोर आले आहे. त्यापैकी लोणीकंद येथे एक गुन्हा दाखल आहे. बिबवेवाडी पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल आहेत.

आरोपी कसे फसवायचे? टोळीचा म्होरक्या महाजन साथीदारांची निवड करून, त्यांना एक मोबाईल आणि सीमकार्ड देत असे. तसेच त्यांना एक दीरहम देऊन ग्राहक शोधायला पाठवत असे. कार असलेल्या व्यक्तीजवळ जाऊन आरोपी त्यांना दीरहम चलन दाखवत. संबंधित व्यक्तीच्या आमिषाला बळी पडून, भारतीय चलनात पैसे देत असे, मात्र आरोपी त्याला साबणाच्या वडीला कागद गुंडाळून तो रुमालात बांधून देत.

## परप्रांतीय कामगाराने 5 लाखांचे दागिने चोरले; ते गाढ झोपेत असतानाच...




सांगली:सांगली शहरातील गणपती पेठ परिसरात एका सोनाराच्या दुकानातील परप्रांतीय कामगारानेच तब्बल पाच लाख रुपयांच्या दागिन्यांवर डल्ला मारला. या प्रकरणी व्यापारी प्रसाद संजय पाटील (वय २५) यांनी सांगली शहर पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी कामगार सुरूख शेख (रा. कलकत्ता) याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. सांगली शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रसाद पाटील यांचे गणपती पेठ परिसरात संजय राखी सेंटरच्या दुसऱ्या मजल्यावर आदिनाथ चेन्स नावाचे दागिन्यांचे दुकान आहे. दुकानाच्या शेजारीच पाटील हे आपल्या कुटुंबीयांसह राहतात. त्यांच्या दुकानात कोलकात्यातील सुरूख शेख हा गेल्या काही महिन्यांपासून कारागीर म्हणून काम करत होता. याठिकाणी दागिने बनविण्यासाठी सोने ठेवण्यात आले होते. शेख याच दुकानात राहत होता. गुरुवारी पहाटे दोन ते पाच वाजण्याच्या दरम्यान दुकानात कोणीही नसताना त्याने दुकानातील पाच लाख रुपयांचे दागिने घेऊन पळ काढला. यावेळी इमारतीमधील रहिवासी गाढ झोपेत होते.

## वालीव पोलीस ठाणे यांची कामगिरी घरफोडीसह इतर एकुण 13 गुन्हे करणारे सराईत गुन्हेगारांना केले जेरबंद



वालीव : घरफोडी व चोरीचे गुन्हे वालीव पोलीस ठाणे यांच्या हद्दीत वाढल्यामुळे आरोपींचा शोध घेऊन घडलेल्या गुन्ह्यांच्या छडा लावण्यासाठी वालीव पोलीस ठाणेयांच्या पथकाने गुन्हा घडला त्या घटनास्थळावरुन मिळालेल्या तांत्रिक गोष्टींचा अभ्यास करुन तसेच गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयांचा तपास करुन आरोपी १) सुभाष शितलाप्रसाद केवट रा. ठि. राजीव गांधी उड्डाणपुलाच्या खाली असलेल्या झोपडयात, शिरवणे नेरुळ, नवी मुंबई २) राजु मारुती वंजारी रा. टि. सदर, ३) दिनेश कुमार केवाराम पटेल रा. ठि. विठ्ठल मंदिराचे समोर, वसई पुर्व. ४) नितीन शांतीलाल जैन रा. लोकमान्य टिळक मार्ग, गोरेगाव पश्चिम, ५) शाहरुख सलीम खान रा. ठि. गोणीनगर, जोगेश्वरी पुर्व, ६) उमेश शिवाजी निनताबाजे, रा. इंद्रीरा वसाहत, नवजीवन, वसई पुर्व ७) कृष्णा बिरबल विश्वकर्मा रा. घरतवाडी, बिलालपाडा, नालासोपारा पुर्व ८) गौरव भरत वतारी रा. बिलालपाडा, नालासोपारा यांना ताब्यात घेण्यात आले व सदर आरोपींची गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी कसून चौकशी केली असता त्यांनी गुन्हे केल्याची कबुली दिली व अश्या प्रकारचे त्यांच्यावर एकूण १३ गुन्हे दाखल आहेत हे हि पोलीस तपासादरम्यान उघडकीस आले.

गुन्हयातील चोरीस गेलेले मोबाईल, चांदीचे लगड व दागिने, मंदिरातील घंटा, पितळी/ब्रास ई पिन असा एकुण- एकुण ३ लाख ८१ हजार ७४० रुपये किंमतीचा माल आरोपीकडून हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त, परीमंडळ-२ वसई, श्री. अमोल मांडवे सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळीज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोनि.श्री.राहुलकुमार पाटील (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा.मनोज मोरे, मुकेश पवार, योगेश देशमुख, पो.ना. सचिन दोरकर, किरण म्हात्रे, अनिल सोनवणे, राजेंद्र फड, सतीश गांगुर्डे, पो.अंम.विनेश कोकणी, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, गजानन गरिबे यांनी केलेली आहे.

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालया मार्फत सायबर गुन्हे विरुद्ध जनजागृती अभियान.




दिनांक ०१/१०/२०२१ रोजी मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेस एक वर्ष पुर्ण झाल्याने पोलीस आयुक्तालयाचे वतीने दिनांक ०१/१०/२०२१ ते ०७/१०/२०२१ रोजी पर्यंत पोलीस आयुक्त कार्यालय, शाखा व सर्व पोलीस स्टेशन येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने विरार पोलीस ठाण्याच्या वतीने दिनांक ०१/१०/२०२१ रोजी सायबर गुन्हयांना आळा घालण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी अभियान राबविण्यात आले आहे. सदर कार्यक्रमादरम्यान कॉलेज मधील प्राध्यापक, विदयार्थीनी, डॉक्टर, नर्सेस, बँक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सायबर गुन्हयांमार्फत नागरिकांची कशी फसवणुक केली जाते व त्यापासून नागरिकांनी कशाप्रकारे सावध रहायला हवे याकरिता सदर अभियाना दरम्यान माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमामध्ये वक्ते म्हणून श्रीमती रेश्मा साळुखे व सायबर तज्ञ श्री विक्रांत पवार यांनी मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमप्रसंगी श्री प्रशांत वाघुडे, पोलीस आयुक्त परिमंडळ-३, श्रीमती रेणुका बागडे, सहा पोलीस आयुक्त व विरार पोलीस स्टेशनचे अधिकारी-अंमलदार उपस्थित होते.

## तुमच्या कुत्र्याला रस्त्यावर घाण करु देऊ नका', किरकोळ वादातून 2 कुटुंबात जोरदार हाणामारी





पुणे : लोकांचे प्राणीप्रेम सध्या वाढले आहे. मात्र, कुत्रे पाळण्याच्या लोकांच्या हौसेचा इतरांना मात्र मनस्ताप होतो. सकाळ संध्याकाळ, रात्री या प्राण्यांनी घरात घाण करुन नये, म्हणून त्यांना बाहेर फिरायला घेऊन जातात. ही कुत्री रस्त्यावर घाण करुन ठेवतात. या कारणावरुन लोहगावात दोन कुटुंबामध्ये सार्वजनिक रोडवर शनिवारी रात्री जोरदार हाणामारी झाली. दोघांनीही परस्पराविरुद्ध विनयभंगाच्या तक्रारी दिल्या. पोलिसांनी दोन्ही कुटुंबातील १२ जणांना अटक केली आहे. हा प्रकार भुकण वस्तीतील गुरुद्वारा कॉलनीतील सार्वजनिक रोडवर २ ऑक्टोंबरला रात्री साडेनऊ वाजता घडला.याप्रकरणी एका ५५ वर्षाच्या गृहस्थाने विमानतळ पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. त्यांच्या कॉलनीतील एका महिला रात्री त्यांच्या पाळीव कुत्र्याला फिरायला घेऊन बाहेर पडल्या होत्या. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना तुमच्या पाळीव कुत्र्याला घाण करायला बसवू नका, असे सांगितले. त्यावरुन या महिलेच्या कुटुंबातील ७ जण दुचाकीवरुन आले. त्यांनी लाकडी बांबुने फिर्यादी व त्यांच्या नातेवाईकांना बेदम मारहाण केली.

## तुंबळ हाणामारी! शौचालयावरुन दोन गट भिडले; एकमेकांच्या जीवावर उठले, अनेकांची फुटली डोकी



नवी दिल्ली - देशात अनेक धक्कादायक घटना या सातत्याने समोर येत आहेत. लोकांमध्ये विविध कारणांमुळे वाद होतात. कधी कधी क्षुल्लक कारणांमुळे सुरू झालेले वाद पुढे टोकाला जातात. अशीच एक घटना आता समोर आली आहे. सार्वजनिक शौचालयाच्या वापरावरून दोन गटात जोरदार राडा झाला आहे. लाठ्या-काठ्यांनी, दगड-विटांनी एकमेकांवर हल्ला केला. नागरिकांमध्ये झालेल्या तुंबळ हाणामारीत अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. काहींचं डोकं फुटलं आहे. सर्व जखमींना उपचारासाठी तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिल्लीतील गीता कॉलनी परिसरात नव्याने सार्वजनिक शौचालय बांधण्यात आले आहे. या भागात राहणाऱ्या बुद्ध बाजार परिसरातील नागरिक त्याचा वापर करत असतात. मात्र लोकसंख्येच्या मानाने शौचालयांची संख्या कमी असल्यामुळे येथे नंबर लावण्यावरून सतत नागरिकांमध्ये छोटीमोठी भांडणं होत असतात. यासाठी नंबर लावण्याच्या मुद्द्यावरून वाद झाल्यानंतर दोन गट आमनेआमने आले आणि त्यांच्यात तुफान हाणामारी झाली. लोकांनी मिळेल त्या वस्तू एकमेकांवर फेकल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. हाणामारीत अनेक नागरिक जखमीघटनेची माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. पण संतप्त झालेल्या लोक काहीच ऐकून घेण्यास तयार नव्हते. पोलिसांनी जास्तीचा फौजफाटा बोलावून परिस्थितीवर नियंत्रण मिळवलं.

## 10 हजारांची लाच घेताना झाडूवाल्यासह दोघे रंगेहाथ, पुणे महापालिकेत एसीबीची कारवाई

पुणे : पुणे महापालिकेतील एका मुकादमासह झाडूवाल्याला लाच घेताना रंगेहाथ अटक करण्यात आली आहे. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने 10 हजार रुपयांची लाच घेताना दोघांना पकडले. काय आहे प्रकरण? रवी लोंढे आणि हर्षल ज्ञानेश्वर अडागळे (वय 31) अशी लाच प्रकरणात पकडण्यात आलेल्या दोघा आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोघांना न्यायालयाने सुनावली दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

हवालदार 50 हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ

दुसरीकडे, अहमदनगरमध्ये पोलीस हवालदाराला 50 हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आलं आहे. प्रकाश आसाराम बारवकर असं पोलीस हवालदाराचं नाव असून पोलीस उपअधीक्षक हरीष खेडकर यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे. अहमदनगरच्या बेलवंडी पोलीस ठाण्यातील मिसिंग प्रकरण बंद करण्यासाठी ही लाच मागितल्याची माहिती आहे. 22 हजार रुपयांची रक्कम स्वीकारताना पंचासमक्ष बेलवंडी पोलीस ठाण्याच्या आवारात त्याला पकडण्यात आलं. आरोपी विरोधात बेलवंडी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक अधिकारी करत आहेत.

नाशिकमध्ये निवृत्त सहकाऱ्याकडून लाचेची मागणी

दुसरीकडे, निवृत्त सहकाऱ्याकडून लाच स्वीकारणारा लिपीक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात सापडला आहे. नाशिकमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उत्तर विभाग कार्यकारी अभियंता कार्यालयात हा प्रकार समोर आला आहे. दहा हजारांची लाच घेताना आरोपींना रंगेहाथ अटक करण्यात आली.

मुख्य लिपीक प्रविण नामदेव पिंगळे आणि वरिष्ठ लिपीक लता शांताराम लहाने (बोडके) यांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.



आपल्याच कार्यालयातील निवृत्त सहकाऱ्याकडून त्यांनी लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. मुख्य लिपीक आणि वरिष्ठ लिपीक यांना 10 हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीने रंगेहाथ अटक केली. निवृत्त कर्मचाऱ्याकडून सेवापुस्तक पडताळणी आणी रजेच्या फरकातल्या बिलासह अन्य बिलांचे काम करुन देण्यासाठी दोघांनी दहा हजार रुपयांची लाच मागितल्याचं समोर आलं आहे.

वसईत सेवानिवृत्त ग्रंथपालाची लाचखोरी

दरम्यान, वसईतील सेवानिवृत्त ग्रंथपालाला 25 हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ अटक करण्यात आली आहे. वसईच्या उपनिबंधक सहकारी संस्थेच्या कार्यालयातून सावकारी परवाना मिळवून देण्यासाठी त्याने पैशाची मागणी केली होती. गंगाराम जयराम जाधव (वय 70) असे रंगेहाथ अटक केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. अँटी करप्शन ब्युरो ठाणे, कॅम्प पालघरच्या युनिटने ही कारवाई केली.

सावकारी परवाना मिळण्यासाठी आपले सरकार पोर्टल मार्फत तक्रारदाराने उपनिबंधक सहकारी संस्था, कार्यालय, वसई येथे अर्ज दाखल केला होता. त्याचा पाठपुरावा करण्यासाठी अर्जदार संबंधित कार्यालयात गेले असता आरोपी त्यांना भेटला.

तक्रारदारावर प्रभाव पाडून परवान्याचे काम करुन देण्यासाठी त्याने तक्रारदाराकडे 30 हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली आणि बाहेर हॉटेलमध्ये भेटण्यास बोलवले होते. त्यानुसार पडताळणी केली असता त्याने तक्रारदाराकडे पडताळणीच्या वेळी 25 हजार रुपयांची मागणी करुन ती रक्कम स्वीकारली. आरोपीला रंगेहाथ पकडण्यात आले असून पुढील कारवाई चालू आहे. या सापळ्यात उपनिबंधक कार्यालयातील महत्त्वाचा कोण अधिकारी आहे, याचाही तपास सुरु आहे.

नाशिकच्या शिक्षणाधिकारी वैशाली वीर लाचखोरीच्या आरोपात अटक

दरम्यान, शिक्षक संस्थेच्या शाळांना मंजूर झालेल्या 20 टक्के अनुदानातून नियमित वेतन करण्याचे आदेश देण्याच्या मोबदल्यात शिक्षणाधिकारी वैशाली वीर यांनी 8 लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. शासकीय वाहन चालकाच्या माध्यमातून ही लाच स्वीकारताना नाशिक जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी डॉ. वैशाली वीर-झनकर यांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ताब्यात घेतले होते.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्क:-9594418181 / 8424989898